# मनोरुग्णांकडे पाहताना पूर्वग्रहदूषित दृष्टी बदलण्याची गरज

## मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे; एकलव्य फाउंडेशन, प्राज फाउंडेशनतर्फे पुस्तक प्रकाशन

**पुणे, दि. २७** - मनोरुग्णांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित दृष्टी समाज म्हणून वावरताना बदलण्याची निकड आहे. त्याचबरोबर मनोरुग्ण व्यक्तींइतकाच त्याच्या कुटुंबीयांचा विचार अगत्याचा असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे यांनी रविवारी केले.

एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ आणि प्राज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित करण्यात आलेल्या वादळ पेललेले नाविक (मनोरुग्णांची काळजी घेणाऱ्यांच्या स्वानुभवकथा) आणि या पुस्तकाचा इंग्रजी




अनुवाद द रेसिलियंट केंप्टन्स या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन डॉ. साठे यांच्या हस्ते झाले. मनोविकारतज्ज्ञ डॉ. निश्चोल रावळ, फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल वर्तक, उपाध्यक्ष तसेच पुस्तकाचे संकलन व शब्दांकन करणाऱ्या प्राची बर्वे, प्राज फाउंडेशनच्या सीएसआर विभागाच्या प्रतिनिधी बागेश्री आडकर, संस्थेच्या सचिव स्मिता गोडसे आणि खजिनदार मंजिरी चव्हाण आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ डॉ. उल्हास लुकतुके, डॉ. विद्याधर वाटवे, मानसशास्त्रज्ञ डॉ. सुजला वाटवे, १सा चे माजी अध्यक्ष अमृत बक्षी, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाचे कन्सल्टंट डॉ. सचिन गणोरकर आदी मान्यवर श्रोत्यांमध्ये उपस्थित होते.

मानसिक आजारांच्या बाबतीत ब्लेम आणि शेम, असे दोन शत्रू आपल्या मनात वावरत असतात कारण समाज म्हणून आपण अजूनही पूर्वग्रहदूषित नजरेचे आहोत. वैज्ञानिक दृष्टीने आपण मनोरुग्णांकडे कधी बघणार, असा प्रश्न डॉ. साठे यांनी उपस्थित केला. मनोविकारांच्या बाबतीत आता शारीरिक आणि मानसिक, पातळीवर अतिशय प्रभावी औषधोपचार उपलब्ध आहेत. पण, कोविडकाळात प्रचलित झालेली न्यू नॉर्मल ही संज्ञा आपण बरे झालेल्या मनोरुग्णांच्या संदर्भात मोकळेपणाने कधी अंगिकारणार, हा प्रश्न आहे. कुणा एकाचा हा दोष नसून, समाजघटक म्हणून आपल्या सामाजिक जबाबदारीचे वर्तुळ आपण पूर्ण केले पाहिजे, असे डॉ. साठे यांनी नमूद केले. डॉ. रावळ, बर्वे, डॉ. मुलमुले, आडकर, गोरे, गणोरकर, जोशी यांनी मनोगत मांडले. चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

रामायणातील प्रसंगांवर आधारित आले.

सोन्याच्या खरेदी-विक्रीसाठी आहे. याच वाढते, असेही त्यां

# मानसिक आरोग्याचा संघर्ष पुस्तकबद्ध

## 'वादळ पेललेले नाविक' स्वानुभवकथांचे पुस्तक मोठ्या उत्साहात प्रकाशित

**पुणे, शहर प्रतिनिधी.** मानसिक आजारातून सावरून पुन्हा सर्वसामान्य आयुष्य जगण्याचा प्रवास हा केवळ रुग्णापुरता मर्यादित नसतो, तर त्याच्या कुटुंबीयांचाही संघर्ष त्यात सामावलेला असतो. या प्रवासातील अनुभव मांडणाऱ्या 'वादळ पेललेले नाविक' या पुस्तकातून मनोरुग्णांविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानसिक आजारांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित दृष्टी बदलण्याची गरज असल्याचे मत मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे यांनी व्यक्त केले. एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ आणि प्राज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित 'वादळ पेललेले नाविक' या पुस्तकाचे तसेच 'द रेसिलियंट कॅप्टन्स' या इंग्रजी अनुवादाचे रविवारी (दि. २५ ऑक्टोबर) फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सभागृहात लोकार्पण झाले.

### आयुष्यात होणारे बदल या कथांमधून येतात समोर

डॉ. साठे म्हणाल्या, मानसिक आजारांबाबत दोषारोप आणि लाज वाटण्याची भावना हे मोठे अडथळे आहेत. या आजारांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असून, आज प्रभावी उपचार उपलब्ध आहेत. सावरणाऱ्या व्यक्तींसोबतच त्यांच्या कुटुंबीयांप्रतीही संवेदनशीलता आवश्यक आहे. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. निश्चोल रावळ यांनी पुस्तकातील अनुभवकथांचे महत्व अधोरेखित केले. रुग्ण आणि कुटुंबीयांच्या संघर्षासोबतच आजारातून सावरल्यानंतर आयुष्यात होणारे बदल या कथांमधून समोर येतात. संकलक व शब्दांकनकार प्राची बर्वे यांनी हा प्रवास रुग्णापुरता मर्यादित नसून कुटुंबीय, मित्र, नातेवाईक, आणि समुपदेशकांचाही असल्याचे सांगितले.



पुणे दिनांक

मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ । १५

# मनोरुग्णांकडे पाहण्याचा पूर्वग्रह बदलण्याची गरज - डॉ. शिरीषा साठे

**पुणे :** 'मनोरुग्णांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित दृष्टी समाज म्हणून वावरताना बदलण्याची निकड आहे,' असे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे यांनी रविवारी व्यक्त केले.

एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ आणि प्राज फाउंडेशन यांच्या वतीने 'वादळ पेललेले नाविक' (मनोरुग्णांची काळजी घेणाऱ्यांच्या स्वानुभवकथा) आणि या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'द रेसिलियंट कॅप्टन्स' या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमात डॉ. साठे बोलत होत्या. प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. निश्चल रावळ, फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल वर्तक, उपाध्यक्ष तसेच पुस्तकाचे शब्दांकन करणाऱ्या प्राची बर्वे, प्राज फाउंडेशनच्या सीएसआर विभागाच्या प्रतिनिधी बागेश्री आडकर, संस्थेच्या सचिव स्मिता गोडसे व खजिनदार मंजिरी चव्हाण या वेळी उपस्थित होत्या.

मनोरुग्ण व्यक्तींइतकाच त्याच्या कुटुंबीयांचा विचार अगत्याचा असल्याचे सांगून डॉ. साठे म्हणाल्या, 'मानसिक आजारांच्या बाबतीत समाज म्हणून आपण अजूनही पूर्वग्रहदूषित नजरेचे आहोत. वैज्ञानिक दृष्टीने आपण मनोरुग्णांकडे कधी बघणार? मनोविकारांच्या बाबतीत आता शारीरिक आणि मानसिक, पातळीवर अतिशय प्रभावी औषधोपचार उपलब्ध आहेत.'

# 'मनोरुग्णांकडे पाहण्याचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बदलण्याची गरज'

**पुणे, २५ ऑक्टोबर**

समाजात अजूनही मानसिक आजारांविषयी अनेक गैरसमज आहेत. मनोविकारांवर प्रभावी औषधोपचार उपलब्ध असतानाही उपचारांनंतर बरे झालेल्या व्यक्तींना समाजात सहजपणे स्वीकारले जात नाही. मानसिक आजार असलेल्या व्यक्तींकडे पाहण्याचा समाजाचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. त्यांच्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहून त्यांना समाजात सन्मानाने जगण्याची संधी दिली पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे यांनी केले.

एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ आणि प्राज फाउंडेशन यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या वादळ पेललेले नाविक या पुस्तकाचे आणि त्याच्या 'द रेसिलियंट कॅप्टन्स' या इंग्रजी अनुवादाचे लोकार्पण रविवारी (दि. २५) झाले. फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात डॉ. शिरीषा साठे बोलत होत्या.

डॉ. निश्चोल रावळ यांनी या पुस्तकातून मानसिक आजारांवरील उपचारांनंतर रुग्णांच्या आयुष्यात होणारे बदल, त्यांचा संघर्ष आणि कुटुंबीयांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या आव्हानांचे चित्रण झाल्याचे सांगितले. उपचारांनंतर बरे झालेले रुग्ण समाजात अधिक समृद्ध आयुष्य जगू शकतात. त्यांचे अनुभव इतरांना प्रेरणा देणारे आहेत, असे ते म्हणाले.

पुस्तकाच्या संकलक आणि शब्दांकनकार प्राची बर्वे यांनी मानसिक आजार हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसतो, असे सांगितले. रुग्णासोबत त्याचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्र, वैद्यकीय तज्ज्ञ आणि समुपदेशक यांचाही हा प्रवास असतो. या सर्वांच्या अनुभवांना शब्द देताना मानसिक आजाराकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. नंदू मुलमुले यांनी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधला. हे पुस्तक केवळ अनुभवकथन नसून मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील महत्त्वाचा दस्तऐवज ठरू शकते, असे यावेळी सांगितले.

# मनोरुग्णांकडे पाहण्याची दृष्टी बदलावी : डॉ. साठे

**पुणे, ता. २५ :** ''मनोरुग्णांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित दृष्टी समाज म्हणून वावरताना बदलण्याची निकड आहे'', असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे यांनी रविवारी व्यक्त केले .

एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ आणि प्राज फाउंडेशन यांच्यातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'वादळ पेललेले नाविक' या मवोरुग्णांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवकथा असलेल्या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी या पुस्तकाच्या 'द रेसिलियंट कॅप्टन्स' या इंग्रजी अनुवादाचेही प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी मनोविकारतज्ज्ञ डॉ. निश्चोल रावळ, फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल वर्तक, उपाध्यक्ष तसेच पुस्तकाचे संकलन व शब्दांकन करणाऱ्या प्राची बर्वे आदी उपस्थित होते.

डॉ. रावळ यांनी हे पुस्तक प्रत्येकासाठी प्रेरक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. ''मानसिक आजार हा एका व्यक्तीपुरता मर्यादित नसतो. तो कुटुंबीय, नातेवाईक, स्नेही आणि वैद्यकीय तज्ज्ञ, समुपदेशक अशा अनेकांचा एकत्रित प्रवास असतो, याचा प्रत्यय या स्वानुभवकथांमुळे आला'', असे बर्वे म्हणाल्या. बागेश्री आडकर यांनी प्राज फाउंडेशनविषयी माहिती दिली. संस्थेच्या खजिनदार मंजिरी चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र लोकमंच




LATEST NEWS PUNE

# मानसिक आजाराकडून सर्वसामान्य आयुष्याकडे

Fri, Oct 30, 2026 Updated 07:31 PM IST

दिव्य मराठी

# मानसिक आजारावरील स्वानुभव कथांच्या पुस्तकाचे प्रकाशन: 'वादळ पेललेले नाविक' मधून शुभंकर-शुभार्थींचा प्रवास व्यक्त; डॉ. शिरीषा साठे यांचे प्रतिपादन

पुणे 5 दिवसांपूर्वी

